श्रीगोमाता विजयते.

गोरक्षण-ज्ञानप्रसारक-पुस्तकमाला.

पुष्प १ लें.

# गोमातेचा हंबरडा.



प्रकाशकः—गोविंद विनायक वरवे,
गोरक्षण-ज्ञानप्रसारक आणि
मुंबई गोवर्धन संस्थेचे स्वयंसेवक.
मार्मुगांव—हार्बर.

१ ली:—प्रति २०००

त-मनन व प्रसार करणें.

शकें १८४७, सन १९२५.

हें पुस्तक मडगांव-गोवा येथें 'हिंदु' छापखान्यांत छापिलें.

REFBK-0002821
२८२९

## श्रीगोमाता विजयते.

गोमांतकांत गोरक्षणज्ञानप्रसाराकरितां जमविलेल्या फंडाचा कार्तिक शु. १ दा शके १८४५ते आश्विन कृष्ण ३० स्या शके १८४७पर्यंतचा जमाखर्चः-

| जमा रु. | | खर्च रु. | |
|---|---|---|---|
| १२३।- | पावतीपुस्तकावरून जमा. | २२८ | गोवर्धन संस्था-कचेरी, मुंबई यांजकडे वेळोवेळीं पाठविले ते. |
| १४३॥= | तिकीटबुकांची जमा. | ११॥। | पोस्टेज. |
| २ | देणगी. | ११ | प्रवासखर्च. |
| १४॥= | देवळें व सार्वजनिक स्थानीं ठेवलेल्या पेटींतील जमा. | ६॥≡ | जाहिराती वगैरेंची छपाई. |
| | | १२॥- | किरकोळ. |
| २८४८- | एकूण जमा. | २७० | एकूण खर्च. |
| | | १४८- | शिल्लक पेस्तर वर्षाकारणें. |
| | | २८४८- | एकूण. |

## शिलकेचा तपशील

१४८-सांवर्डे येथील स्टेशनमास्तर रा. रा. सदाशीव गोपाळ गोगटे यांजकडे अनामत.

### प्रमुख दातेः—

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. रा. रा. | दत्ताराम विष्णु शेट कांदे, | मुरगांव रु. | ११। |
| ,, ,, ,, | धुंडाप्पा ईश्वराप्पा गाडवी, | पणजी ,, | १० |
| ,, ,, ,, | शेट शिवराम जीवतराम, | वास्को ,, | ६। |
| ,, ,, ,, | भिकाजी पांडुरंग वालावलकर, | ,, ,, | ५ |
| ,, ,, ,, | भिषग्वर्य रामचंद्र पां. वैद्य, | पणजी ,, | ५ |
| ,, ,, ,, | के. टी. पार्थी, कंट्राक्टर, | बल्लारी ,, | ५ |
| ,, ,, ,, | महादेव लक्ष्मण कांदे, | मुंबई ,, | ५ |
| | | | ४७॥ एकूण |

आ. न. से.

**गो. वि. बरवे**

REFBK-0002821

# प्रकाशकाचे चार शब्द.

१. गोमांतकांतील हिंदूंमध्यें गोमातेबावत आपल्या कर्तव्यासंबंधीं दिसून येणारा अनास्थारूपी अंधःकार अंशतः तरी कमी व्हावा या हेतूनें गोरक्षणज्ञानप्रसाराची ही ज्योत लावल्याला आज दोन वर्षे होऊन गेलीं. स्वपात्रता–तैलाच्या भरपूर पुरवठ्याच्या अभावीं व क्वचित् अनुकूल परिस्थितिरूपी वाऱ्याच्या सोसाट्यामुळें या ज्योतीचा प्रकार जितका पसरावा तितका पसरला नाहीं. तथापि 'यत्ने कृते यदित सिध्यति कोऽत्र दोषः' या म्हणीकडे लक्ष देऊन, व कदाचित् स्वीकृत कार्यविषयींची आमची निष्ठा कसास लावून पाहण्यासाठींच जनतारूपी जनार्दनाचें हें लटकें औदासिन्य असेल असें मनोदेवतेस वाटत असल्यामुळें निराश न होतां त्याची सेवाच अधिक निष्ठेनें चालविण्याचा निश्चय केला. वरील निश्चय, त्या परमेश्वराच्या चरणीं भक्तिभावानें वाहिलेल्या या प्रथम पुष्परूपानें प्रकट होत आहे.

२. यापूर्वी गोमांतकांतील 'हिंदु' 'भारता'दि प्रमुख वर्तमानपत्रांतून लेख देऊन, बुद्धिमान वर्गांत या विषयाचा ऊहापोह सुरू व्हावा या हेतूनें त्यांचेकडून लेख मागवून ते प्रसिद्ध करून, स्वतः गांवोगांवीं हिंडून समक्ष, त्याचप्रमाणें कीर्तनकार–व्याख्यानकारांकरवीं, अशा शक्य त्या मार्गांनीं गोरक्षणाचा हा प्रश्न जनतेपुढें ठेवण्याचा प्रयत्न करीत आलों आहोंत. या कामीं मुरगांव, सांवर्डें वगैरे मुक्कामीं फंडहि जमविण्यांत आला. फंडापैकीं तीन चतुर्थांश रक्कम मुरगांकरांकडून आलेली असल्यामुळें त्यांचे येथें विशेष आभार मानले पाहिजेत. आजपर्यंत सुमारें २८० रु. जमले; त्यांचा जमाखर्च दुसरीकडे दाखल केलाच आहे.

३. गोमांतकांतील सुशिक्षित समाजाकडून मात्र या कामीं पाहिजे

तशी सहानुभूति मिळाली नाहीं, हें सांगण्यास विषाद वाटतो. एकट्या 'हिंदु' कारांनीं मात्र आमचें काम स्वत:चें समजून त्यास स्वार्थत्यागपूर्वक हातभार लावला; किंबहुना त्यांचे मदतीवांचून आमचा उद्देश आज जनतेसमोर जितका मांडला गेला आहे तितका मांडतां आला असता कीं नाहीं याची शंकाच आहे. असो. विद्वज्जनांपैकीं सुमारें १५० लोकांना लेख पाठविण्याची विनंति-पत्रकें पाठविण्यांत आलीं. त्यांपैकीं अवघ्या पांच जणांनीं त्यांची पोंच देण्याचे श्रम घेतले व लेख असे दोघांनींच पाठविले. धनिक वर्गाचें लक्षही इकडे जावें तितकें जात नाहीं. विशेष शोचनीय गोष्ट म्हणजे प्रत्येक श्रीमान् गृहस्थानें आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा गांवांतील नगर-शेटाकडे जणूं मक्ताच दिलेला असतो, ही होय. त्यांच्या आंकड्याचें इंजिन लागलें तरच यांच्या दातृत्वाचे डबे हलूं लागावयाचे. नाहीं तर नाहीं. 'गो' हा हिंदूंच्या आचारधर्माचा आत्मा आहे. गोरक्षणाभावीं हिंदु धर्माचें अस्तित्वही नाहींसें होणार आहे. गोरक्षणापायीं प्राणदाना-साठीं महाराष्ट्रीय जनता एका काळीं एका पायावर तयार असे, या गोष्टीकडे लक्ष देऊन आमच्या सुशिक्षित व संपन्न समाजानें या प्रश्नासंबंधीं जास्त जागरूकता दाखवावी व वाटेल ती पै-पैसा मदत स्वबुद्धीनें करून या सत्कार्यास हातभार लावावा अशी त्यांना आमची नम्र प्रार्थना आहे.

४ सहानुभूतीचा अग्नि पेट घेईल तेव्हां घेवो. पण आज आक्षेपरूपी धुराचे लोट मात्र जिकडे तिकडे धुमसत आहेत. जनापवादांस तोंड देणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधणें होय; तथापि त्यांचा अगदींच निमूटपणें स्वीकार करणें म्हणजे स्वीकृत कार्याविषयीं समाजाच्या संशयपिशाच्या हातीं कोलीत दिल्याप्रमाणेंच होईल. ही आपत्ति टळावी म्हणून त्यांतील निदान वरपांगीं समंजस दिसणाऱ्या आक्षेपांचें निरसन करणें जरूर आहे.

५ पहिला आक्षेप—आम्ही फंड प्रांताबाहेर पाठवितों हा. मुंबई आम्हांस परप्रांत वाटावी ना ? हरहर ! आपल्या संकुचित क्षेत्राबाहेरील परिस्थिति व प्रजा यांच्याविषयीं संपूर्ण अनास्था हा हिंदुसमाजाच्या हाडींमासीं फारां दिवस पासून खिळलेला जीर्णज्वर ! हिंदूंच्या कमकुवतपणाचें निदान यांतच आहे. आफ्रिकेच्या एका टोंकांतील 'रिफां' करितां स्वधर्मीय म्हणून फंड जमविण्यासाठीं तांतडीनें उठणारा मुसलमान कोणीकडे व कोहट येथील हिंदूंसाठीं फंड मागावयास आलेल्या स्वयंसेवकास 'कोहटमध्यें हिंदू आहेत काय? काय झालें त्यांना? मारलें मुसलमानांनीं? ऊः! नेहमींचेंच आहे! शिवाय कुठें कोहट, कुठें आम्ही!!!" म्हणून पाठ फिरविणारा हिंदु कोणीकडे? खिलाफतीच्या रक्षणार्थ, ज्याचें सिंहासन अजून डळमळतें अशा अरबस्थानांतील वाळवंटांत हिंडणाऱ्या इब्न सौदचा सल्लाही हिंदी महंमदीयांस घ्यावासा वाटतो. आम्हां गोमांतकीय हिंदूंस मुंबापुरस्थ बंधू गोरक्षणकार्यीं परकीय वाटतात. गोमांतकीय व तदन्य हिंदू हे सनातन धर्मरूपी एकसूत्राधारानें हलणारीं चित्रें! हिंदुधर्म-संघटनेचें कोणतें एकादेंही काम गोमांतकीयांना एका हातीं पार पाडतां येणें शक्य आहे काय? मग हें सूत्र जेथून व ज्या शक्तीनें हलविलें जातें त्या स्थानास व सूत्रास बळकटी आणणें श्रेयस्कर, का चित्रांना बळकटी आणण्याचा उपक्रम श्रेयस्कर? आमच्याशीं संबंध नसलेल्या परप्रांतीय राजकीय चळवळी पोसण्यास तर आमचा फंड जात नाहीं? आमचें कार्य गोरक्षण-ज्ञानप्रसार. याची दिशा जी संस्था आंखते व तदर्थ झटते तिच्याकडे फंड गेल्यास बिघडलें कोठें? शिवाय आम्ही आतां येथें जमलेला फंड येथेंच निबंध छापून मोफत वांटणें वगैरेकडे खर्च करणार असल्यामुळें या आक्षेपाचें बूडच मुळीं नाहींसें होतें. तेव्हां आधींच पोंचट अशा वरील आक्षेपाचा वारंवार उच्चार करण्यानें स्वतःच्या संकुचितपणाचें प्रदर्शन होणार असल्यामुळें हा हट्ट समजूतदारपणानें आमचे बंधू सोडून देतील अशी आशा आहे.

६ दुसरा आक्षेप—आम्ही दुसऱ्यांस गोरक्षण करण्यास सांगतों, स्वतः करीत नाहीं हा! 'आधीं करावें मग सांगावें' या समर्थोक्तीच्या सत्यतेवर आम्ही शितोडा पाडूं इच्छित नाहीं. तथापि ऊंस गोड म्हणून जसा तो मुळास कट खावयाचा नसतो तद्वतच तत्व चांगलें म्हणून तें पाहिजे तेथें अक्षरशः लावणें अप्रशस्त होय. सतीधर्मावर प्रवचन देणाऱ्या विद्वानांस 'आधीं लुगडेंचोळी नेसून एकाद्याची वायको होऊन रहा आणि मग बोला' असें एकादी बाई ह्मणेल किंवा स्त्रीस्वातंत्र्याच्या आवश्यकतेविषयीं दयानंदां-सारखा बालब्रम्हचारी बोलावयास उठलारे उठला कीं त्यास 'आधीं चतुर्भुज व्हा मग बोला' असें हटकूं लागेल, अथवा अर्थशास्त्राचा ऊहापोह करूं लागणाराचें तोंड 'आधीं दुकान थाटून चालवून दाखवा, मग जीभ उचला' असें म्हणून बंद करूं लागेल तर तें हास्यास्पद हो-णार नाहीं काय? स्वतः भिक्षा न घातली तरी घालणाऱ्याचें दार दाख-वावें ही संतांचीच उक्ति नव्हे काय? मग एकीकडे रात्रंदिवस दुसऱ्या-ची नोकरी व दुसरीकडे प्रचारासाठीं प्रवास अशा कात्रींत आमची गोपालनेच्छा सांपडून तिचे तुकडे झाल्यामुळें, दुधाची तहान ताकावर भागवावी त्याप्रमाणें, गोरक्षणज्ञानप्रसाराची आम्ही कांस धरली हा काय आमचा भयंकर अपराध? शिवाय आम्ही करतों तेंच उत्तम असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं. स्वतः गायी पाळून वर दुसऱ्यांस गोरक्ष-णाची महती व उपाय समजाऊन सांगणारा सव्यसाची भेटेल तर त्या-स साष्टांग नमस्कार करण्याची आमची केव्हांही तयारी आहे. आमची सेवा 'पत्रं पुष्पं फलं तोयम्' या सदरांतली. तेव्हां आमच्यांत नाहींत त्या सद्गुणांकडे बोट दाखवून आम्ही करीत असलेल्या अल्पस्वल्प सत्कार्यास गालबोट लावण्याचा निरर्थक मोह आमच्या बंधूंना कां व्हावा बरें? असो.

७ आम्ही पाठविलेला मजकूर वेळेवर छापून व आपल्या छापखा-न्याचाही फायदा आम्हांस सवलतीनें घेऊं दिल्याबद्दल 'हिंदु'कारांचे

त्र केंपें येथील 'भारत'कारांचे आम्ही पुनः एकदां आभार मानतों. त्याचप्रमाणे लेखकांचेही आभार मानून आमच्यावर कृपादृष्टि ठेवण्याची त्यांस विनंति करतों. पेडण्याचे वे. शा. सं. रा. रा. दत्तात्रेय तुकाराम शास्त्री पणशीकर यांचे तर आमच्यावर अनंत उपकार आहेत. त्यांनीं आपल्या प्रतिभाशैलांतून वाहणाऱ्या काव्यसरितेचें पाणी आमच्या प्रयत्न–वृक्षास घातलें नसतें तर तो हें 'हंबरडा' पुष्प प्रसवताच ना. असो. गोरक्षण–ज्ञानप्रसाराचें काम म्हणजे गोवर्धन पर्वत उचलण्याइतकेंच श्रमाचें. भगवान् गोपालकृष्णांना त्याची काळजी आहेच. तथापि त्यांच्याबरोबर ज्याप्रमाणें गोपांनींही प्रत्यक्ष गोवर्धन उचलतांना आपापल्या काठ्या उचलून टेंकू दिला तद्वतच सुशिक्षित–अशिक्षित, संपन्न–विपन्न, वगैरे सर्वांनीं, यथाशक्ति सहाय्य करून गोमातेचा आशीर्वाद संपादावा अशी विनंति करणारा,

मुरगांव बंदर
गुरुद्वादशी १८४७

आ. नम्र
गो. वि. बरवे.

———o———

काव्य

२८२१
८६८

# हिंदुधर्माची व्याख्या

## गाय माझी माय.

नभोमंडळांतील नवग्रहांशीं सूर्यनारायणाचें जें नातें तेंच भरणीवरील धर्मांशीं हिंदुधर्माचें. तथापि विस्मृतीच्या घनपटलास मतमतांतराच्या धुक्यानें साथ केल्यामुळेंच कीं काय एवढ्या शास्वत भगवत्संदेशाचेंही यथार्थ ज्ञान करून घेणें हिंदुधर्मीयांस अशक्य होऊन बसलें आहे. हिंदुधर्माची चतुःसीमा व वैशिष्ट्य यांस निश्चितता आणणें मी मी म्हणणाऱ्यांसही आज दुष्कर वाटतें. चवाठ्यावर सांडलेले दाणे चारजणांच्या पायांखालीं तुडविले जाऊं नयेत अगर पांखरांपोटीं जाऊं नयेत म्हणून फडक्यांत घालून त्याची मोटली बांधू जावें तों तें अपुरें पडल्यामुळें दाणे पुनः भुईवर पडून भरणाराचे श्रम मातीमोल होऊन जावेत त्याप्रमाणेंच शोचनीय अवस्था राजसत्तेच्या अभावीं परकीयांच्या पकडींत सांपडून क्षीणबल होत असलेल्या चोवीस कोट हिंदूंना धार्मिक ऐक्यसूत्रानें संघटीत करूं इच्छिणाऱ्या महात्म्यांची होत आहे. श्रुतिमूल, स्मृतिप्रणित, पुराणप्रथित रूढिरज्जूंनीं करचून बांधलेल्या तत्वसमुदायांना 'सनातनधर्म' असें नांव कांहीं देतात. तें पत्करून त्या निशाणाखालीं सर्व हिंदूंची जमवाजमव करूं जावें तों पुराणाचा पसारा व रूढीची राख बाजूस फुंकून वेदत्रयीच्या अग्निस्फुलिंगाकडे जाऊं इच्छिणाऱ्या आर्य व ब्राम्होसमाजीयांचे हात सोडावे लागतात. ही आपत्ति टळावी म्हणून 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' एवंगुणविशिष्ट हिंदुत्व म्हणावें तर वेदबाह्य जैन व बुद्धधर्मीयांना वगळावें लागतें; व त्यापेक्षां दुःखदायक गोष्ट म्हणजे

हे वेद उच्चारण्याचा तर राहोच पण नुसते ऐकण्याचा सुद्धां अधिकार, अर्थात जरूरी नाहीं, तर त्याच्या प्रामाणाच्या बागुलबोवास तरी भीक घाला कशाला म्हणून रुसून सहा कोटींचा अस्पृश्य समाज पाठ फिरवून जातो. वेदांना प्रमाण मानणाऱ्यांमध्येंही सगुण साकार मूर्तींचे पूजक व निर्गुण निराकार परब्रम्हाचे प्रार्थनोपासक असे तट पडतात. मूर्तिपूजकांतही शिवोपासक, वैष्णव, गाणपत्य वगैरे अनंत भेद आहेतच. खुद्द शैवांत व वैष्णवांतही पंथ कांहीं थोडे नाहींत. लिंगायत लोक शैव खरे, पण हिंदू म्हणवून घेण्यांत त्यांना अपमान वाटतो. आर्यसमाजिस्टांना 'हिंदू' या नामाभिधानाची लाज वाटते. शिखांना शिखानष्टच ज्यास्त जवळचे वाटतात. हिंदुसमाजाची ही फूट नाहींशी करून तिच्याजागीं एकजुटीची प्रतिष्ठापना करणें जितकें अगत्याचें तितकेंच, अशा रीतीनें, अशक्य होऊन बसलें आहे.

२. हिंदुसमाजांत एकसूत्रीपणा कसा आणतां येईल हा विचार हिंदुमहासभेचा आहे व तदर्थ प्रयत्नही होत आहेत. अर्थाअर्थीं आमचा या कार्याशीं प्रत्यक्ष संबंध नाहीं हें खरें. तथापि, गोमातेचें माहेरघर हिंदुस्थान, व तिची सुस्थिति हिंदुमात्रांच्या सामर्थ्यावर अवलंबून असल्यामुळें हा प्रश्न आमच्याही अगदीं जिव्हाळ्याचा होऊन बसला आहे. गोरक्षणाची इमारत उभारली गेलीच तर ती हिंदुसमाजाच्या एकीच्या खांबाशिवाय इतर कशावरही होणें न, अशी आमची दिवसेंदिवस खात्री होत चालली आहे. गोरक्षण शक्यतेच्या कोटींत आणण्याच्या उपायांच्या चिंतनारंभीं हिंदूंच्या एकजुटीचा हा प्रश्न डोळ्यांसमोर प्रथम उभा राहतो तत्संबंधीं एक विचार आमच्या अल्पमतीस सुचला. त्याचा गोरक्षणाशीं निकट संबंध असल्यामुळें व तो पुढें येणाऱ्या **"हिंदूंनो प्रथम लक्ष द्या इकडे"** व **"हंबरडा"** या दोहोंसही प्रस्तावनेदाखल शोभेसा असल्यामुळें येथें नमूद करण्याचें धाडस करीत आहोंत.

३ मानवी समाजाची तत्वविचार, नीतिमत्ता, राजकारण व इतर शास्त्रें यांतील प्रगति जितकी परमेश्वराच्या प्रेरणेनें तितकीच पोटोबाच्या पुटपुटण्यानेंही होत असते. हिंदुस्थानांतील प्रजेच्या पोटाचें मुख्य साधन म्हणजे शेती. हिंदुस्थानांतील हरहुन्नर व कलाकौशल्य हीं शेतीच्या पायावरच उभारलेलीं. शेतीस जीं जीं मुख्य साधनें तीं तीं हिंदूंस मानवी स्वभावधर्माप्रमाणें पूज्य वाटावीत व त्यांनी त्यांना आपल्या विशिष्ट प्रवृत्तीप्रमाणें देवता मानाव्यात हें सहजच होय. शेतीचें क्षेत्र जी पृथ्वी तिला त्यांनी विष्णुपत्नित्वाचें स्थान दिलें. शेतीचा आधार पर्जन्य व नद्या, त्यांस त्यांनी देवता कल्पिलें व शेतीचा परिपोष आणि वाढ हीं गोधनावर अवलंबून म्हणून गाईस, स्वतःस नऊ महिने पोटांत वाढविणाऱ्या परमकरुण माऊलीची योग्यता दिली. हिंदी जनतेस गाय अशा रीतीनें मातेसमान पूज्य होण्याचें कारण हेंच होय. चढाओढीच्या ऐन दंगलींत हिंदूंस दुखवावें म्हणून मुसलमानांनी गाईवर सुरी धरली; (व अद्यापही ती संपूर्णपणें बाजूस घेतली नाहीं.) तथापि स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्याच्या आपल्या उपक्रमांतील मूर्खपणा त्यांना लवकरच उमगूं लागला व त्यांच्यापैकींच गोरक्षणासाठीं मनोभावानें धडपडणारे कांहीं थोडे-थोडके नाहींत. गाय हीच हिंदूंचें धर्मसर्वस्व. वेदांचें नांव ऐकल्याबरोबर नाक मुरडणारे जैन, मूर्ति पाहिल्याबरोबर मागें वळणारे आर्यसमाजिस्ट, देवळांच्या सावलीसही उभे न राहणारे प्रार्थनासमाजिस्ट, अवतारांना अवमानणारे शीख, गुरखे, लिंगायत वगैरे हिंदुसमाजांतील झाडून साऱ्या जातींना व पंथांना गाय ही एकसारखीच पूज्य वाटते. 'गोमाता' हा शब्द ऐकतांच, जो हिंदु असेल, मग तो स्त्री किंवा पुरुष, बाल अगर वृद्ध, श्रीमान् अथवा गरीब, कसाही असो, त्याचें शीर आपोआप नमतें. हिंदुधर्मांतील सहनशीलता व सर्व भूतहितार्थ यत्न या दोन अमोलिक तत्वांचा सक्रिय उपदेश हिंदु मठाधिकाऱ्यापेक्षां, या दोन गुणांचा मूर्तिमंत पुतळा अशा मूक गोमातेकडून

काव्य ७६८



अधिक चांगला होत असल्यामुळेंच परधर्मीयांना हिंदु मठापेक्षां गाय ही द्वेष्यतर होऊन बसली. हिंदूंनांही ती त्याच मानानें प्रियतम झाली.. हिंदु कशासाठीं मरेल तर तो धर्मासाठीं. आजही यास तो तयार आहे. गाय ही त्याच्या बुद्धिगम्य धर्माची पार्थिव प्रतिकृति. अर्थात् धर्मासाठीं प्राणदान जितकें अगत्याचें तितकेंच गोमातेसाठींही मानणें हा हिंदूंचा स्वभाव बनून राहिला. आमच्या म्हणण्यास इतिहासही साक्ष देईल. महंमदीयांचा लोंढा विलासमग्न हिंदूंवर अचानकपणें घसरल्यावेळीं फुटलेल्या फळींची पुनः जमवाजमव करण्याच्या भगिरथ प्रयत्नांत ज्यांनी ज्यांनीं यश संपादन केलें त्यांना 'गो...... प्रतिपालक' ही बिरुदावळीच यथार्थ वाटली. विजयनगरच्या रायांना व खुद्द शिवछत्रपतींना हीच पदवी धारण करण्यांत महदभिमान वाटला. मुसलमानांविरुद्ध हिंदूंना चेतविण्यांत येई तेव्हां 'हे गोघातक' या शद्बप्रयोगाचा जादूप्रमाणें उपयोग होत असे. गाय ही अशा रीतीनें सर्व हिंदूंस प्राणाहून प्यारी अ अमित स्फूर्तिदायक असून धर्मार्थाची जिवंत उत्सवमूर्तीच असल्यामुळें, तिच्या भोंवतीं, वाताहत झालेल्या हिंदुसमाजास पुनः जमवितां येईल, यांत तिळप्राय शंका नाहीं. आज हिंदुमात्रांना थरारून सोडणारा व मतभेदांच्या कोनाकोपऱ्यांतून त्यांना खडबडून जागें करून एकीच्या रणमैदानांत गोळा करण्यास 'गाय माझी माय' हा एकच सर्वोत्कृष्ट रणरव होय.

४ 'गाय माझी माय!' ही आरोळी ऐकतांच कोणता अस्सल हिंदु बेभान होणार नाहीं? या हाकेचा अर्थ समजण्यास विद्वत्ता नको, श्रीमंती नको, योग्यता नको; फक्त नसनसांतून हिंदु रक्त अजून वहात असलें कीं पुरें! सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं अज्ञांस अगम्य अशा तात्विक विचारांचा काथ्याकूट करून फलनिष्पत्ति न झाल्यामुळें हताश होण्यापेक्षां, ऐकतांच उमगणारा, चटकन पटणारा, हृदयवृत्तींस थरारून सोडणारा व इतकें असूनही स्वरूपानें साधा परंतु परिणामीं अमोघ असा

'गाय माझी माय' हा रणरवच हिंदुधर्मांचा प्रणवमंत्र कल्पून त्याच्या जदानें हिंदूंनां आत्मोद्धार करून घेण्यास शिकविण्याकडे येथील हिंदू पुढारी आपलें शक्तिसर्वस्व खर्च करतील तर किती बरें होईल?

'एक हिंदु'.



काव्य २००

# "हिंदूंनो! प्रथम लक्ष द्या इकडे".

[सर्व वृत्तपत्रकर्त्यांनीं कृपा करून हिंदु जनतेपुढें ठेविलेली खालील पद्यमय गोमातांची करुण कहाणी आपापल्या पत्रांत एक वेळ प्रसिद्ध करावी व गोसेवेचें श्रेय संपादावें अशी प्रार्थना आहे.

द. तु. पणशीकर]

## आर्या.

वक्ते बोलति इकडे तिकडे श्रोतेहि डुलत आयकती ।
परि दोघेही अंतीं वसनें झाडूनि निजगृहा झुकती ! ॥ १ ॥
कृतिशून्य फुकट असलीं व्याख्यानें कासयास ऐकवितां? ।
बधिरापुढती सुंदर सुस्वर गाऊनि काय फळ कविता? ॥ २ ॥
उष्णें हिमें प्रवर्षें न फुटे न थिजे न ओल ज्या तीळ ।
त्या खडकावरि डोकें फोडुनि घ्यायास कोण जातील? ॥ ३ ॥
दीनांस्तव जरि तुमच्या हृदयाचे होउं पावती तुकडे ।
तरि द्या अवधान जरा मद्वचनांतील शुद्ध हेतुकडे ॥ ४ ॥
भूतदयेची लागुनि आंच जरी जीव गदगदा उकडे ।
तरि शांत चित्त करुनी हिंदूंनो! प्रथम लक्ष द्या इकडे ॥ ५ ॥
माता दोन जगीं ह्या, ज्यांचा उपकार ना कुणी माय! ।
प्रसवे ती एक, दुजी जी पाजी दूध तीहि गो-माय ॥ ६ ॥
पहिलीचा असतो कीं नाथ, बऱ्या काळजीस जो वाहे ।
दुसरी मात्र बिचारी घळघळ नेत्रांत आंसवें वाहे ॥ ७ ॥
त्या गोमातेविषयीं तुमचें सदयांतरंग वेधावें ।
यास्तव तुमच्या पायीं करुणा भाकावयास मी धावें ॥ ८ ॥
धर्माभिमान सुटला नाहीं ना? 'हिंदु' नांव धरितां ना? ॥

मातेसम गोमाता मानुनि तद्दुग्धपान करितां ना ? ॥ ९ ॥
जीच्या पान्ह्यावरती तुमचे बनतात चिमखडे बचडे ।
हें जाणतां तुम्हीं तरि हिंदूंनो ! प्रथम लक्ष द्या इकडे ॥ १० ॥
निजवत्सांसम आम्हां पोशी सोसूनि ताप अनिवार ।
त्या श्रीगोमातेचे स्मरतां ना परम थोर उपकार ? ॥ ११ ॥
जीचे बालक तुमचे नांगर, मोटा, रहाट वा छकडे ।
ओढिति हें स्मरतां तरि हिंदूंनो ! प्रथम लक्ष द्या इकडे ॥ १२ ॥
आर्यांचें धन गोधन आर्यांच्या पूज्य देवता गाया ।
किंवा तो धर्माचा प्राण असे हें नकोचि सांगाया ॥ १३ ॥
त्यांची काय पहा रे ? झालीसे परम कठिण आज गती ।
म्हणत असेल शिवाजी कीं 'हिंदू जगति कासया जगतीं' ? ॥१४॥
अप्रतिबंध—अहा रे ! मातांचा घात सारखा चाले ।
तो उघड्या डोळयांनीं पाहुनि तुमचें न हृदय लव हाले ? ॥ १५ ॥
तीक्ष्ण सुरा गायांच्या मानेवरि चालतां कसार्यांचा ।
अंतींचा हंबरडा कानीं तुमच्या नये कसा यांचा ? ॥ १६ ॥
जी वेदना सुरी दे रक्ताचीं उसळवूनि कारंजीं ।
ती द्याया शक्ति नसे व्याघ्रवृकांच्याहि खरतरा-पंजीं ॥ १७ ॥
कांट्याची कळ पोंचुनि होय जशी ती तशी स्मरा 'हाय' ! ।
समजे प्राणांतींची मग गायांची व्यथा कशी काय? ॥ १८ ॥
करुण कथा ही ज्याच्या हृदया पिचवुनि करी न खिन्न मन ।
तो शून्य हृदय किंवा मुक्त! तया नरवृकास मन्नमन ॥ १९ ॥
लागो भूतदयेला हळद! जळो धर्मभाव वा सगळा ।
स्वार्थाकरितांच उठा! गायांचा सोडवावयास गळा! ॥ २० ॥
गायांचीं शिरकमळें तुटुनि किती उडति हाय! चिळकांड्या ।
मग दूध मुलां कुठलें? रोडावुनि होति चरण कर काड्या ! ॥ २१ ॥

काव्य - ७६८

क्रोडों गोमातांची आर्यावर्तांत चालली भाजी! ।
दूधतुपाविण होती पाप्यांचे पितर लोकही आजी! ॥ २२ ॥
लक्षावधि गायांची जणुं आयांची कलिंगणांसम ती ।
निर्गत पाहुनि जांत दडपुनि छाती? बने उदास मती? ॥ २३ ॥
ये वेळ नांगरा स्त्री बांधायाची कृषीवलांवरती ।
त्या! दुबळ्यांच्या कुदळी किति शेताची जमीन नांगरती ! ॥२४॥
जी गाय हिंदुदैवत! ती बहुधा हिंदुच्या नसे गोष्टीं ।
मात्र सभेंत नटासम बोलति गोरक्षणीं सुक्या गोष्टी ॥ २५ ॥
रस्त्यावरूनि किंवा उसणें आणूनि शेण, सारवण— ।
हिंदु स्त्रियांस करितां पाहुनि दुःखित न होय तो कवण ? ॥ २६ ॥
श्रेष्ठ म्हणविते ब्राम्हण आणिति गोमूत्र पंचगव्यास— ।
परक्याच्या गोठ्यांतुनि ! कां मग न रडे वसिष्ट वा व्यास ? ॥२७॥
चांडाळा ! कलिकाला ! घे उगवुनि सूड एकदां पुरता ।
अमुचेंच दैव खोटें ! ना तरि परवा तुझी कवण करिता ? ॥ २८ ॥
आत्मार्पणें करीती गोमाता लाल गाल भलत्यांचे ! ।
होऊनि जरत्कारू तोंड अम्हीं मात्र पाहतों त्यांचें ! ॥ २९ ॥
दूध, दहिं, ताक, लोणी, तूप असें स्वादु रुचिक भूवरलें ।
ज्या पंचामृत देती पुष्ट्यारोग्यादि ज्यांत गुण भरले ॥ ३० ॥
ज्या, दिव्य परम पावन गोमय गोमूत्र भेषजा देती ।
धनधान्यें घर भरिती पुरवुनि कीं बैल पिकवुनी शेती ॥ ३१ ॥
यापरि जीवंतपणीं चंदनसम जनहितार्थ झटतात ।
मरुनी जोडा देउनि कंटकभय आमुचेंच हरितात ॥ ३२ ॥
फलभरित शेतवाडी व्हाया खत अस्थिचें पुरवितात ।
यापरि कुठल्या माता सांगा स्वसुतार्थ झिजति वा तात ? ॥ ३३ ॥
त्या कामधेनुंचा अजि शिव ! शिव ! संहार कोण हा चाले ! ।

हिंदूंनो ! लक्ष जरा द्या कीं ! मरुंदेत नवनवे चाळे ॥ ३४ ॥
चाऱ्याच्या दुष्काळें किति ! किति असिघातिं मरुनि हा ! गाई ।
शेतीस योग्य ऐशा जनांवरांची पडे महागाई ॥ ३५ ॥
दुबळा शेतकरी मग कोठुनि घेइल जनावरें विकतीं ? ।
कसवट व्हावी कसली ? शेतें तरि काय बापुडीं पिकतीं ? ॥३६॥
शेतास पीक येना; पिकलें धनि, सावकार, नृप खाये ।
अन्नान्नगत कृषीवल गावें गृहरूप पेटल्या खाये ! ॥३७॥
तो पोट जाळण्या मग असलीं--नसलीं विकी गुरें ढोरें
जरि म्हणतीं 'न विका हो !' आक्रोशें रडत बायकापोरें ॥३८॥
शेतकरी सकलांचा पोशिंदा ! त्या विपत्ति ये जी जी ॥
त्याची न ती जगाची ! श्रीमंता कोण मग म्हणे 'जी जी' ॥३९॥
कृषिनाशकारणांतिल गोसंहार प्रधान कीं आहे ।
परि याकडे न कोणी स्वार्थव्याप्तृत सुशिक्षितहि पाहे ॥ ४० ॥
गोवधरूपें संतत चालें वध आर्यभूमिचा समजा ।
गोरक्षणास लागा झाली तितुकी पुरे मिजास मजा ॥ ४१ ॥
जी काळ--जीभ केवळ वीज तशी गोशिरीं सुरी लवेत ।
तिजला कारण आम्हीं, हिंदूंनो! स्मरुनि हृदय कालवतें! ॥ ४२ ॥
ऐकुनि वधसमयींची गाईची हांक, जें न उर फाटे ।
तें कसलें हिंदूचें? जें विधिनें बनविलेंच उरफाटें ॥ ४३ ॥
नच भावना जयाच्या हृदयीं कीं 'माउलीच ही गाय' ॥
हिंदु नव्हे तो, प्रौढी 'मी हिंदु' अशी जरी जनीं गाय ॥ ४४ ॥
हिंदूच्या दृष्टीनें हिंदू गोमाउलीकडे बघते, ।
तरि राजरोस इतुका तद्वध करण्या न कवणही धजते ॥ ४५ ॥
प्रत्येक घरीं नेमें हिंदू, एकेक पोशिते गाय ।
तरि कोटिसंख्य गाई जगल्या ! आर्यांस मग उणें काय ? ॥ ४६ ॥

परि नसल्या नव गरजा भागविण्या सणसणा रुके उडती।
पाळाया गाय घरीं सगळें दारिद्य मात्र ये पुढती॥ ४७॥
जो बूटपाटलोणित कोटचिरूटांत कीं गिन्या दवडी।
त्याच्या खिशांत शिव! शिव! पाळाया एक गाय ना कवडी॥ ४८॥
वार्षिक घरखर्चाहुनि उमाप करिती धनव्यय चहांत।
गोमाउलीस एका पोसाया मात्र आंखडति हात॥ ४९॥
जे पांढरेपणावरि विकतें मोलें दुधाचिया पाणी।
त्याचे रतीब घ्याया पैशाचें करिति किति वृथा पाणी॥५०॥
परि एकादी स्वगृहीं पोसाया गाय येति नव नाकीं।
जणुं यवनभवन म्हणतिल गाईच्या पायिं हिंदुभवना कीं!॥ ५१॥
डौलांत 'हिंदु' म्हणविति परि त्यांची चालरीत नाचरणीं।
जणुं साफल्य समजती केवळ परकीय दुष्ट अनुकरणीं॥ ५२॥
जें हिंदुत्वविघातक त्याचें करिती अचूक अनुकरण।
न मनीं विवेक करितीं कीं हिंदुत्वास मूर्त हें मरण॥ ५३॥
किति नखशिखांत घेतीं साहेबी सोंग! म्हणुनि काय तया–।
अनुकरणा अनुसरुनी धेनुविशीं त्यजिति पूज्यभाव दया?॥ ५४॥
'जीवत्पितृकें वापन न करावें' शास्त्र यापरी विनवी।
परि नव तरुण, मिशांतें बोडुनियां दाखवीति ट्रम नवी॥ ५५॥
अबलांसम निष्पौरुष झाले कीं आर्यपुत्र दैवबलें।
हें न कथितां कळावें म्हणुनि मिशा काढितात कीं न कळे॥५६॥
ढेकुणमिशा बनवुनी कित्येकां फ्रेंचलहरिवरि जाणें।
वाटे बहुमानाचें परि थोरी यांत काय? हरि जाणे॥ ५७॥
उचलुनि परकीयांचे विचार उच्चार आणि आचार।
स्वत्व, शरीर तसें मन विकुनी होती जगांत लाचार॥ ५८॥
स्वातंत्र्याच्या मोहक गप्पांला भुलुनि पारतंत्र्य पुरें–।

संपादिलें! न आतां अपुलेपण आमुच्यांत तिळहि उरे ॥ ५९ ॥
लंगोटीही यात्री लज्जारक्षणिं अम्हां युरोपानें ! ।
ती न मिळेशी होतां नेसावीं लागतील कीं पानें! ॥ ६० ॥
अमुच्या स्त्रीवर्गाला सौभाग्य–चुडाहि कीं युरोप भरी ।
काय दशा ओढवली! ह्या अमुच्या प्रिय सुवर्णभूमिवरी! ॥ ६१ ॥
उत्तम युरोपसंस्कृति! अधमाधम आमुची!' मनें ठरली ।
धर्माभिमान मेला! दृष्टि पुरी स्वार्थकादिळिंत फिरली ॥ ६२ ॥
त्याचीच परिणती ही! अवनतिचिखलांत कुजतसों तेणें ।
नरकांत पडुनि वेसण बैल तसे नाचतों परेच्छेनें! ॥ ६३ ॥
प्रिय हिंदु बांधवांनो! मी वदलों तें तुम्हां जरी पटलें ।
तरि खोट्या भुरळीचीं डोळ्यांवरचीं करा दुरी पटलें ॥ ६४ ॥
'मी कोण?' हें विसरलां? दासपणा पारतंत्र्यनिरयांत–।
आचरणें; हा धर्मचि मानुनि साफल्य समजतां यांत ॥ ६५ ॥
खावें, प्यावें, ल्यावें, भोगावे विविध भोग, आराम ।
याहूनि वेगळें कीं आहे—नेणाच—आपुलें काम ॥ ६६ ॥
जोडुनि करसंपुट मी अधिक–उण्याची तुम्हां क्षमा मागें ।
विनयें प्रार्थी हें कीं, पूर्ण विचारें पहा पुढें मागें ॥ ६७ ॥
हिंदुत्व आणि संस्कृति जगवा जीवंत धरुनि अभिमान ।
हिंदुत्वा दवडूनी व्यर्थचि धन–कनक–विभव–बहुमान ॥ ६८ ॥

———o———

# हंबरडा फोडी गाय!

(चाल—उद्धवा शांतवन कर जा)

"सोडवा आपुली माय!" हंबरडा फोडी गाय! ॥ ध्रु. ॥
"करकरून मज बांधोनी। हे कसाब चिरिती मान ॥
या यारे! कुणि धांवोनी। घुटमळती पंचप्राण! ॥
आर्य हो! तुम्हांवांचोनी। रक्षिल मज सांगा कोण? ॥
जावें मी शरण कुणातें? ॥
हिंदूंविण माझें नातें ॥
पाळील कोण सांगा तें ॥
मी अनाथ झालें काय?" हंबरडा फोडी गाय! ॥ १ ॥
"वासरें लेक यांमाजी। अंतर मी धरिलें काय? ॥
बांधुनि मम-पाडस पिळितां। पान्हवलें नाहीं काय? ॥
मम गोरस सेवुनि, झालां। पुष्ट, तें विसरलां काय? ॥
पान्हा मी तुमच्या बाळा ॥
घातलें खाउनी दिधला ॥
जरि बडगा मजवरि बसला ॥
तरि धन्या चाटिलें! हाय!" हंबरडा फोडी गाय! ॥ २ ॥
"सद्गुणी पुत्र माझे मी। सेवेसी तुमच्या देतें ॥
ते तुम्हां अन्न द्यायाला। नांगरती तुमचीं शेतें ॥
वाहती तुम्हां सुख व्हाया। गाडीच्या सबळ धुरेतें ॥
उसळतां तीक्ष्ण आसूड ॥
ओढिती गाडिचें धूड ॥
उपकृतिचा मजवरी सूड ॥

उगवला जात हा काय ?" । हंबरडा फोडी गाय ! ॥ ३ ॥
"करितें कीं शेणखतानें । मी सुपीक तुमचीं शेतें ॥
मरुनीही तुमच्या पायां । कातडिचा जोडा देतें ॥
ऐशापरि तुमच्या काजीं । हाडांची काडें करितें ॥
जी तुम्हां जन्म दे जननी ॥
मज अशी करी का करणी ? ॥
पाहिली कुणी का नयनीं ? ॥
परि मीच मात्र असहाय !" । हंबरडा फोडी गाय ! ॥ ४ ॥
"दूध तूप देउनि सकलां । मी कडबा पेंढा खातें ॥
मी मुकें जनावर दावें । ज्यास घाल तिकडे जातें ॥
ब्राम्हण वा कसाय हो कां ! । सारिखाच पान्हा देतें ॥
हें समता शीलाचि नकळे ? ॥
कापाया चरचर सजले ! ॥
प्रभुला तरि कैसें रुचलें ? ॥
आर्य धर्म मेला काय ?" । हंबरडा फोडी गाय ॥ ५ ॥
"सिंहमुखीं कंठ जयानें । मजकारितां आपुला दिधला ॥
तो दिलीप लेंकरुं माझें ! । तो पिता वसिष्ठहि गेला ॥
रामदास आणि शिवाजी । गेला रे ! गेला ! ! गेला ! ! ! ॥
जाहलें दारची भाजी ! ॥
उठतो तो खुडितो ताजी ॥
गाजीचे बनले पाजी ! ॥
मोकालितें दुबळी धाय !" । हंबरडा फोडी गाय ॥ ६ ॥
"मुसलमान बंधुहि माझी । ऐकुनियां हांक थरारे ! ॥
हिंदूंनो ! मेलां कारे ! । त्यांची तरि लाज धरारे ! ॥
"आहांत हिंदु रक्ताचे ! । खिस्त्यांस उठुनि विनवारे ! ॥

धेनुच्या दावणी बघतां ।
आर्तस्वर कानीं पडतां ।
सुखनिद्रा कसली घेतां ? ॥
यश अक्षय; वैभव जाय" । हंबरडा फोडी गाय ॥७॥
प्राणाहुनि गोधन आर्या ! । प्रिय होतें! प्राक्तनवाद-॥
टांकुनियां गोमातांचा । अंतींचा ऐका साद ॥
मृत्यूच्या दारांतुनि हा । देतें शुभ आशिर्वाद ॥
"गोरक्षण होउनि हातें ।
घरभरोत शेतें भातें ॥
तुमचें शुभ चिंतित जातें ।
शुभचिंतित मरते गाय! " ॥दृष्टांत सुचवि हा काय? ॥८॥

दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

---

## "हिंदूंनो प्रथम लक्ष द्या इकडे".

(पृ. १६ वरून पुढें)

(खालील आर्या मागचा फॉर्म छापून निघाल्यावर हातांत पडल्यामुळें येथें घेणें भाग पडत आहे.)

ये भक्तीचें भरतें हृदया गोमाउलीस देखून ।
ती कीं हिंदुत्वाची जाणावी आनुवंशिकी खूण ॥६९
प्रिय हिंदुबंधुनो! ती दावा तुमच्यांत सर्व लोकांस ।
जीवा पीळ पडूनी सत्वर गोरक्षणा कसा कास ॥ ७० ॥
घ्या कीं गोसेवेचें व्रत-विप्रांनो! त्वदीय हा धर्म ।
अन्य व्रतें कशाला ? ज्यांत फलाहार एवढें कर्म ! ॥ ७१ ॥
क्षत्रिय म्हणविति त्यांचें गोब्राम्हण पालनव्रत प्रकट ।
गोपालन तरि त्यांनीं आज करावें ! मरोत नष्ट भट ॥ ७२ ॥

वैश्यांचीं स्वाभाविक कृषि, गोरक्षण, उदीम हीं तीन—।
कर्में भगवान् वदले! ज्यांविण जगतांत लोक जगती न ॥ ७३ ॥
ते धन्य! धन्य! उदमी; जे खेडोपाडिं हात पोंचविती ।
योगक्षेम जनांचा करुनी सुखशांति लोकिं नांदविती! ॥ ७४ ॥
परि ते आज तिहींतुनि एकाचि वाणिज्यकर्म आचरती ।
तेणें गोमातांच्या माना उघड्याहि सहज कीं पडती! ॥ ७५ ॥
तरि आज बद्धपरिकर होउनि गोपालनीं वणिक्सार्थ ।
निज—चातुर्वर्ण्यांतिल परमोच्च स्थान कीं करो सार्थ ॥ ७६ ॥
अथवा घरासभोंतीं भडकुनि जातां प्रचंड कीं आग ।
व्हावा कशास ऐसा चातुर्वर्ण्यक्रमश्रमविभाग? ॥ ७७ ॥
ज्वालारूप जिभा कीं चाटित वणवा सभोंति वन वेढी ।
मध्यें अडकुनि हरिणी व्हावी भयसंभ्रमें जशी वेडी ॥ ७८ ॥
तशि आर्यमाउलीची गत! जीचे हिंदुंनो! सुपुत्र असां ।
तीं गोरूपें पाहे बापुडवाणी! द्रवे न जीव कसा? ॥ ७९ ॥
कांहीं तरी करा रे! जन्मा येऊनि नांव मिळवा रे! ।
जातो क्षण मोलाचा आयुष्याचा न नेम तें वारें! ॥ ८० ॥
जो जो कोणी 'हिंदू' म्हणवुनि घे आपणा भरतभूत ।
त्याच्यांत संचरावें वारें गोभक्तिचें जसें भूत ॥ ८१ ॥
गोप्राणदानकाजा मागूंया भीक लावुनी झोळी ।
फकिरी घेउनि मारूं लाथ सुखावरि! जळो पुरी-पोळी! ॥ ८२ ॥
ज्याच्यानें जें होइल तें तितुकें तो सहाय करिल तरी ।
हळु हळु पिपीलिकेच्या न्यायें फलसिद्धिचा बनेल गिरी ॥ ८३ ॥
हो ब्राम्हण अंत्यज वा न स्मरतां भेद घडवुनी जूट ।
आरंभा कार्यातें! पाठीराखा असे जटाजूट. ॥ ८४ ॥

समाप्त.

2629

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२ | १० | पहा रे? | पहा रे! |
| १३ | ४ | छाती? | छाती! |
| ” | ” | मती? | मती! |
| ” | १२ | वसिष्ट | वसिष्ठ |
| ” | १३ | एकदां | एकदा |
| १६ | १२ | विसरलां? | विसरलां! |
| १७ | १२ | पानवलें | पान्हवलें |
| १८ | २५ | “आहांत | आहांत |


## विक्रीस तयार!!

प्रत्येक हिंदु कुटुंबांतील स्त्री-पुरुषांनीं अवश्य संग्रह करण्यायोग्य अशीं दोन पुस्तकें! विद्वान व भारदस्त वर्तमानपत्रकारांचे सुंदर अभिप्राय!

(१) जामात्यास नजराणा किंमत ०-५-०
(२) बापाचा सासुरवासिनीस हितबोध ०-६-०

लेखकः—दत्तात्रेय तुकाराम पणशीकर,
पेडणें-गोवा.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—
द. तु. पणशीकर. पेडणें, गोवा.
वि. ग. शेंबेकर. १७, बनामहाल लेन, मुंबई, ४.

२८२९

श्रीगोमाता विजयते.

# अगदीं फुकट!

गोमांतकीय बंधु-भगिनींस

## गोमातेचा हंबरडा

पोस्टखर्चही न घेतां फुकट.

एका कार्डावर नांव व पत्ता

स्पष्ट कळवा.

**गोमांतकाबाहेरील लोकांनीं ०= चीं तिकिटें पाठवावीं.**

निबंध मागवून छापून मोफत वांटावयाचें काम सतत चालू रहाणार असल्यामुळें बक्षिसें, छपाई व पोस्टेज यांकरितां अतिशय खर्च येणार आहे. तरी आपण प्रत्येक शुभप्रसंगीं गोमातेची आठवण ठेवून शक्त्यनुसार मदत खालील पत्त्यावर पाठवावी, अशी प्रार्थना आहे.

REFBK-0002821
REFBK-0002821

आ. न.
गोरक्षण ज्ञानप्रसारक
G. V. Baravê
Mormugão, Harbour.

गोभक्त चोंडे महाराज यांच्या गोवर्धन संस्थेचें

## साप्ताहिक गोरक्षण

साऱ्या राष्ट्रभर गोरक्षण कार्याची जागृति व्हावी, व भारतीय जनतेचें लक्ष गोमातेच्या अंत:काळच्या हंबरड्याकडे वेधलें जावें यासाठी गोरक्षण विषयाची सांगोपांग चर्चा करणारें सदर साप्ताहिक सतत ८ वर्षे प्रसिद्ध होत आहे. तरी ताबडतोब ३ रु. म. आ. ने पाठवून वर्गणीदार होऊन अथवा २५ रु. एकदांच देऊन आश्रयदाते व्हा, व या पवित्र कार्यास साह्य करा. आश्रयदात्यांस ट. खर्चही न घेतां पत्र सतत भेटीदाखल मिळतें. नमुना अंक मोफत.

गोविंद विनायक चरवे, स्वयंसेवक, मार्मगोवा, हार्बर, या पत्यावर वर्गणी पाठविली असतां व्ही. पी. खर्च वांचेल.

**गोरक्षण कार्यालय—खेतवाडी मुंबई नं. ४.**

## —भारत—

हें साप्ताहिक आज गोमांतकांतच नव्हे, तर एकंदर महाराष्ट्रांत नावाजलेलें असून त्यांतील लेख मुद्देसूद व भारदस्त असतात. नुकतेंच अकरावें वर्ष सुरू झालें असून, स्वतंत्र पोर्तुगीज भागाची निराळी व्यवस्था करण्यांत आली आहे. जाहिरातीसाठी पत्रव्यवहार करा—

पत्ता:—व्यवस्थापक भारत
केपें—गोवा.

# फक्त .।।. पाठविणारांस



श्री गणपती, राम, हनुमान, मुरलीधर, दत्तात्रय व शंकर अशा दर्शनीय ६ रबरी शिक्क्यांची शाईचे गादीसह,

## रबर स्टँप पिक्चर सेट बॉक्स

पोस्टखर्च न घेतां पाठवूं ;

आठ आणे जास्त पाठविणारांस १॥ रुपया किंमतीचा तारखेचा फिरता शिक्का ७-८ वर्षे टिकणारा पाठवूं.



याशिवाय आमच्या कारखान्यांत नांवांच्या पाट्या, नाटकांचे सुंदर पडदे, पत्र्यांचीं कायम टिकणारीं कॅलेंडरें, सर्व प्रकारचे मजबूत रबरी शिक्के, लाखेवर उठविण्याच्या मोहोरा (सिलें), रबर स्टँपची सर्व रंगांची सुबक शाई, रबरी टाईपांच्या पेट्या, डेटर्स, नंबर्स, फोटोच्या सुबक फ्रेमी आणि सर्व प्रकारचीं एनग्रेव्हींग व पेन्टींगचीं कामें तयार करून मिळतील.

**रबरस्टँप मॅन्युफॅक्चरिंग कंपनी**

जुनाबाजार-कादईच्या मागें

**मडगांव-गोवा.**